## INTERNAL NOTE

| |
|---|
| Ref. No:- BKC/MET/IOE/Library/२४-२५ |
| From:- Dr. Sambhaji Patil (Librarian) |
| To: - All Heads, MET-BKC-IOE, Nashik |
| Through: - Principal, MET-BKC-IOE, Nashik |
| Sub.: - दिनांक ०७/०५/२०२५ रोजी, **"राज्यस्तरीय ऑनलाइन योग कार्यक्रमात सहभागाबाबत**....... |
| Date: - ०६/०५/२०२५ |

महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी यांना निमंत्रित करण्यात येते कि, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच यांच्या सूचनेनुसार "Yoga for One Earth, One Health" या संकल्पनेवर आधारित दिनांक **03 मे 2025 ते 21 जून 2025** दरम्यान **राज्यस्तरीय ऑनलाइन योग दिवस ह्या कार्यक्रमाचे आयोजन** करण्यास सांगितले आहे.

त्यानुसार आपण **बुधवार, दिनांक ७ मे २०२५** रोजी **सकाळी १०.३० वाजता** आपण मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे, **अभियांत्रिकी महाविद्यालय**, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथील आपल्या **स्पोर्ट्स रूम** येथे योग हा दिवस साजरा करणार आहोत. **कार्यक्रमाचे प्रमुख आणि प्रशिक्षक म्हणून प्रा. नरेंद्र सोनवणे आणि प्रा. माधुरी पवार हे उपस्तीत असणार आहे.** तरी सर्व प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा.

**दिनांक: बुधवार, दिनांक ७ मे २०२५,**
**वेळ: सकाळी १०.३० ते १२.०० वा.**
**व्याख्यान ठिकाण: स्पोर्ट्स रूम, मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे, अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३,**

तरी, आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनींनी या कार्यक्रमामध्ये उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवावा, यासाठी योग्य ती कार्यवाही करावी. कार्यक्रमामध्ये सहभागाची माहिती व अहवाल योग्य वेळी सादर करण्यात यावा, याची दक्षता घ्यावी.

तरी आपण सर्वांनी ह्या कार्यक्रमास उपस्थित रहावे, आपली उपस्थिती म्हणजेच आमच्या कार्यक्रमाची शोभा आहे.

धन्यवाद

| | | | |
|---|---|---|---|
| **डॉ. संभाजी पाटील** | **प्रा. योगेश पाटणी** | **प्रा. ईश्वर बाठे** | **डॉ. विजयकुमार वाणी** |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |

प्रत : सर्व विभाग प्रमुख

दिनांक: ०८/०५/२०२५

**अहवाल: दिनांक बुधवार, दिनांक ७ मे २०२५ रोजी, राज्यस्तरीय ऑनलाइन योग कार्यक्रम – "Yoga for One Earth, One Health"**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०३ मे २०२५ ते २१ जून २०२५ या कालावधीत "Yoga for One Earth, One Health" या संकल्पनेवर आधारित राज्यस्तरीय ऑनलाइन योग दिवस ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यास सांगितले होते, त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न झाला. त्यानुसार, मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथे बुधवार, दिनांक ७ मे २०२५ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत योग दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत झाली. कार्यक्रमाचे प्रमुख व योग प्रशिक्षक म्हणून प्रा. नरेंद्र सोनावणे सर आणि प्रा. माधुरी पवार यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी योगाचे महत्त्व, त्याचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांसमवेत प्रत्यक्ष योग प्रात्यक्षिक सत्र घेण्यात आले.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद तसेच विद्यार्थ्यांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन स्पोर्ट्स रूममध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमात योगाचे शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम, तसेच "एक पृथ्वी, एक आरोग्य" ही संकल्पना समजावून सांगण्यात आली.

सत्रात व्याख्याते यांनी योगाचे विविध प्रकार, श्वसनाचे महत्त्व, ध्यानधारणा व आरोग्य व्यवस्थापन या बाबींवर मार्गदर्शन केले. उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला व योगाभ्यासाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

तसेच त्याच दिवशी देशभर आयोजित नागरिक संरक्षण **मॉकड्रिल (Mock Drill)** चाही एक भाग म्हणून, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक येथे मॉकड्रिल राबवण्यात आली. आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षितता याविषयी प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी ही कवायत विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरली.

या संपूर्ण कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये योग व आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण केली. सर्व सहभागींचा उपयुक्त सहभाग लाभल्याने कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी NSS युनिट तसेच महाविद्यालय प्रशासनाने विशेष सहकार्य केले. या संपूर्ण कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये योग व आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण केली.


या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद तसेच विद्यार्थी/विद्यार्थिनी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. योगसत्रासोबतच ग्रंथालय विभागाच्या वतीने योग व आरोग्य विषयक पुस्तके वाचनासाठी वितरित करण्यात आली.


कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. योगेश पाटणी आणि प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आखून, योग्य ती कार्यवाही करून संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.


**निष्कर्ष:**


"Yoga for One Earth, One Health" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना योगाचे जागतिक व व्यक्तिगत महत्त्व समजून घेता आले. कार्यक्रमाने आरोग्याबाबत सजगता निर्माण केली असून पुढील सत्रात अधिकाधिक सहभाग सुनिश्चित करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. योगेश पाटणी यांनी आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालनही त्यांनी अतिशय उत्तम पद्धतीने पार पाडले. अतिशय उत्साहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांच्या सोबत सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, पदाधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




Not Me But You
National Service Scheme


GPS Map Camera
Nashik, Maharashtra, India
2vr2+h2g, Bhujbal Knowledge City, Adgaon, Nashik,
Maharashtra 422207, India
Lat 20.041259° Long 73.849959°
07/05/2025 10:52 AM GMT +05:30
Google







धन्यवाद

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. संभोजी पाटील | प्रा. योगेश पाटणी | प्रा. ईश्वर बाठे | डॉ. विजयकुमार वाणी |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |